Jan 17 2015 : MaharashtraTimes (Mumbai)

# ब्रॅण्ड महाराष्ट्र हवा!

## इकॉनॉमिक समिटमधील सूर

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

गुजरातने ब्रॅण्ड तयार केला पण, सर्व मूलभूत सुविधा उपल्बध असूनही स्वत:चे ब्रॅण्डिंग करण्यात महाराष्ट्र मागे पडला असून विदेशातील महाराष्ट्रीयांना राज्याचे ब्रॅण्ड ॲम्बॅसिडर नेमायला हवा, अशी मागणी औद्योगिक आणि आर्थिक विकास असोसिएशन'चे (एमआयईडीए) अध्यक्ष चंद्रकांत साळुंखे यांनी इकॉनॉमिक समिटमध्ये केली.

राज्यात गुंतवणूकदार-उद्योगांसाठी रेड कार्पेट घालण्याची भाषा नेहमी केली जाते पण, प्रस्ताव 'रेड टेप'मध्ये पडतात, ही चिंता उद्योगांना सतावत आहे, असे सांगून साळुंखे म्हणाले, राज्यातील सुमारे दोन लाख छोटे-मध्यम उद्योगांपैकी ६० टक्के उद्योग बंद असून ते पुन्हा सुरू व्हावेत यासाठी राज्य सरकारने प्राधान्याने लक्ष घालण्याची गरज आहे. नव्या उद्योजकांना 'एमआयडीसी'त जमीन उपलब्ध होत नाही. महाग विजेमुळे उद्योग चालवणेच मुष्किल झाले आहे. माथाडी कायदा उद्योगांना लावला जात असून त्याचा पुनर्विचार केला पाहिजे.

### 'उद्योग मित्र'च्या बैठकीला मुख्यमंत्री हवेत!

उद्योगांच्या समस्या जाणून घेण्यासाठी 'उद्योग मित्र'ची बैठक बोलावली जाते पण, कनिष्ठ अधिकाऱ्याला पाठवले जाते. वास्तविक, उद्योगमंत्र्यांनी उपस्थित राहणे अपेक्षित आहे. आता मुख्यमंत्र्यांनीच 'उद्योग मित्र'ला बैठकीला येऊन उद्योगांचे प्रश्न सोडवावेत, अशी विनंतीही साळुंखे यांनी फडणवीस यांना केली.